INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

August 2021 E-ISSN : 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

Peer Reviewed, Referred & Indexed Journal

Special Issue 272

# उदारीकरणानंतरचा भारत १९९१-२०२१



**विशेषांक संपादक :**
संदीप तुंडूरवार
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर
डॉ. शरद सांबारे
यशोदा गर्ल्स आर्ट्स अँन्ड कॉमर्स कॉलेज, नागपूर

**मुख्य संपादक :**
डॉ. धनराज धनगर

**विशेषांक सहसंपादक :**
डॉ. दिनकर चौधरी
डॉ. अमर बोंदरे
डॉ. बाळासाहेब जोगदंड
डॉ. बबीता सिंग
डॉ. संतोष डाखरे

**विशेष सहाय्य :**
प्रा. भास्कर वघाळे

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

E-ISSN :
2348-7143
August - 2021

## अनुक्रमणिका


| अ.नं. | शीर्षक | लेखक /लेखिका | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| 1 | उदारीकरणानंतरचा भारत | श्री. अच्युत गोडबोले | 07 |
| 2 | उदारीकरणानंतरचा भारत १९९१-२०२१उदारीकरणातून उद्भवलेल्या समस्या-एक दृष्टिक्षेप | डॉ. अलका देशमुख | 16 |
| 3 | उदारीकरण-खासगीकरण- जागतिकीकरणः एक चिकित्सक अध्ययन | डॉ. सुभाष उपाते | 22 |
| 4 | उदारवादातून उदभवलेले प्रश्न, समस्या त्यावरील उपाय | डॉ. विनोद मुडे | 30 |
| 5 | 1991 ते 2021 या कालावधीतील भारतीय पंतप्रधानाची उदारीकरणावावतची भूमिका आणि त्यांचा दृष्टीकोन | डॉ. राहुल खरात | 35 |
| 6 | भारतीय लोकशाही आणि जागतिकीकरण | प्रा. हरीषकुमार किनकर | 46 |
| 7 | पी. व्ही. नरसिंहराव यांचे नेतृत्व आणि भारतातील उदारवादाचा प्रारंभ | डॉ. नरेंद्र ई. घरत, डॉ. भुपेन्द्र ई. घरत | 51 |
| 8 | पी. व्ही. नरसिंहरावांचे नेतृत्व व उदारीकरण | डॉ. ज्योती कवठे | 55 |
| 9 | पी. व्ही. नरसिंहराव यांचे उदारीकरणाचे धोरण आणि लोककल्याणकारी लोकशाहीवावतची भूमिका | प्रा. भास्कर वघाळे, डॉ. रायन महाजन | 61 |
| 10 | पी. व्ही. नरसिंहराव यांचे नेतृत्व आणि भारतातील उदारवादाचा प्रारंभ | डॉ. सुशांत चिमणकर | 66 |
| 11 | पी. व्ही. नरसिंहराव यांचे नेतृत्व आणि भारतातील उदारवादाचा प्रारंभ | प्रा. पुनम देशमुख | 73 |
| 12 | पी. व्ही. नरसिंहराव: भारतीय उदारीकरणाचे शिल्पकार | डॉ. नंदाजी सातपुते | 76 |
| 13 | पी. व्ही. नरसिंहराव: भारतीय आर्थिक उदारीकरणाचे प्रणेते | डॉ. संजय गोरे | 79 |
| 14 | 21 व्या शतकातील भारत आणि मोदीकालीन परराष्ट्र धोरणाची दिशा | डॉ. रतन राठोड | 82 |
| 15 | उदारीकरणामुळे भारताच्या परराष्ट्र धोरणात झालेला बदल | प्रा. तानाजी माने | 88 |
| 16 | उदारमतवाद: भारताच्या परराष्ट्र धोरणाचे सामर्थ्य | डॉ. वैशाली प्र. सुपेकर | 94 |
| 17 | उदारीकरणानंतरचे भारतीय संघराज्य | प्रा. डी. डी. ठाकरे | 97 |
| 18 | उदारीकरण आणि भारत | प्रा. लोमेश बावनकुळे | 103 |
| 19 | उदारीकरणानंतरची जागतिक व भारतीय लोकशाही | डॉ. सुनंदा अ. राऊत | 107 |
| 20 | भारताततील उदारवादाची वाटचाल | डॉ. संतोष सं. डाखरे | 113 |
| 21 | उदारमतवाद अर्थ, मुलतत्वे आणि उदारमतवादाचे नवस्वरूप व मूल्यमापन | डॉ.विलास टाले | 118 |
| 22 | राजकीय पक्षांच्या विचारधारा आणि उदारवादी भारत | प्रा. लालचंद मेश्राम | 124 |
| 23 | भारतातील उदारीकरण आणि व्यवस्थेतील वदलते प्रवाह | डॉ. अमर बोंदरे | 127 |
| 24 | 21 व्या शतकातील उदारमतवादी धोरण | डॉ. कल्पना आर. टेकाडे | 132 |
| 25 | कोरोना परिस्थितीतील आरोग्य व्यवस्थेसह सार्वजनिक संस्थांचा उदारवाद | डॉ. विनोद गायकवाड | 137 |
| 26 | उदारीकरणाचा भारतीय शेतीवरील परिणाम | डॉ. अमित पांडे | 142 |
| 27 | उदारीकरणानंतरचा भारत (१९९१-२०२१) | डॉ. मारोती घंटेवाड | 147 |
| 28 | उदारीकरणानंतर भारतातील उच्च शिक्षणापुढील अव्हाने आणि जागतिक स्पर्धा | डॉ. सविता झुंजारे | 152 |
| 29 | उदारवादातून उद्भवलेले प्रश्न, समस्या व त्यावरील उपाय | डॉ. दिनकर चौधरी | 156 |

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Special Issue – 272 : उदारीकरणानंतरचा भारत १९९१-२०२१
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
August - 2021

# उदारीकरण – खासगीकरण – जागतिकीकरण : एक चिकित्सक अध्ययन

डॉ. सुभाष दौलतराव उपाते
सहयोगी प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग प्रमुख
आदर्श कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, देसाईगंज (वडसा) जि. गडचिरोली

## प्रस्तावना :

विसावे शतक हा भांडवलशाहीच्या आत्यंतिक विजयाचा काळ ठरतो. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी ही युरोपीय राष्ट्रे युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका आणि पूर्व आशियातील जपान ही या शतकात अग्रगण्य राष्ट्रे ठरली. ''औद्योगिक क्रांती नंतर राष्ट्रवादाचा उदय, विज्ञानाचा विकास, नवे तंत्रज्ञान परिणामी उत्पादनात वाढ होत गेली. दळणवळणाच्या साधनांमुळे राष्ट्रांचे परस्पर संबंध वृध्दींगत झाले. प्रारंभी इंग्लंड फ्रान्स नंतर सर्व युरोपखंड, युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका आणि जपाण यांचाही समावेश झाला. होकायंत्रामुळे परस्पर परिचयातून व्यापार वृध्दी झाली. आशियातील जुनी राज्ये भारत, चिन, तुर्की साम्राज्यातील प्रदेश आणि इराण ही या जागतिकीकरणात परिघावरची राष्ट्रे म्हणून सामिल झाली''.[1] ''मार्शल योजनेनुसार अमेरिकेचे शेतीतील उत्पादन युरोपीय राष्ट्रांनी विकत घ्यावे या अटीमुळे अमेरिकेच्या उत्पादन वाढीला हातभार लागला व अमेरिका हे जगातील सर्वात श्रीमंत व बलवान राष्ट्र म्हणून पुढे आले. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी , जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय व्यापार संघटना यावर अमेरिकेचा वाढता प्रभाव परिणामी जागतिकीकरणाचे धोरण गरीब राष्ट्रांना स्विकारावे लागले.''[2]

## उदारीकरण :

स्च्ळ धारणा मुळात ज्यावेळी अस्तित्वात आली त्यावेळी 1990 मध्ये सोव्हिएट संघाचे (रून्त) विघटन झाले होते. फक्त अमेरिका महासत्ता बनली. भारतीय अर्थव्यवस्थेत 1990 च्या दशकात आर्थिक गतिविधित अनेक बदल घडून आले. ''1991 मध्ये भारतावर बाह्य कर्जासंबंधीत आर्थिक संकट उभे राहिले होते. सरकार परदेशी कर्ज परतफेड करू शकत नव्हते, तसेच पेट्रोल व इतर महत्वाचे घटक आयात करण्यासाठी, देखरेख करण्यासाठी परकीय चलन साठयात प्रमाणशिर घट झाली होती, की ती पंधरा दिवसांसाठी ही पुरेशी नव्हती. आवश्यक वस्तुंच्या किमतीतील चक्रवाढीमुळे आर्थिक संकट आणखी वाढले होते.''[3] आर्थिक संकट 1980 च्या दशकातील भारतीय अर्थव्यवस्थेच्या आकार्यक्षम व्यवस्थापनाचा परिणाम होता. परकीय चलनातील तूट व त्यामुळे चलन पुरवठयातील अतिरिक्त वाढ यामुळे चलनवाढ घडून आली होती. त्याचबरोबर भारतीय अर्थव्यवस्थेतील संरचनात्मक दोष यामुळे अर्थव्यवस्थेत आपेक्षित वाढ होत नव्हती. भाव वाढीचा दर 17 टक्क्यांपर्यंत वाढला होता. ''या आर्थिक संकटातून बचाव करण्यासाठी भारत सरकारने खाजगी क्षेत्रातील बंधने कमी करून अर्थव्यवस्था खुली करावी, आंतरराष्ट्रीय संस्था व्यापक व अनेक भागात सरकारची भूमिका कमी व सरकारने व्यापार निर्बंध काढावेत या अटीवर जागतिक बँक (आंतरराष्ट्रीय पुर्नरचना व विकास बँक (आय.आर.डी.ए.) आणि आंतरराष्ट्रीय नाणे निधी (आय.एम.एफ.) यांच्याकडून 7 अब्ज कर्ज घेतले होते.''[4]

अर्थ व्यवस्थेत संरचनात्मक बदल घडवून आणण्यासाठी उदारिकरण, खजगीकरण व जागतिकीकरण (एल.पी.जी.) ही प्रक्रिया किंवा हे धोरण 24 जुलै 1991 नंतर सुरू करण्यात आले व त्याचा कालावधी 1992 ते 1997 या पाच वर्षासाठी घोषीत करण्यात आला. आर्थिक सुधारणांच्या उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण हे धोरण साधारण एलपीजी या नावाने ओळखले जाते.